महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

मरारविम/०२/प्रशासन/जअ/प्रसिध्दीपत्रक /१२२७
दिनांक : ११.०६.२०२०

प्रसिध्दीपत्रक

म.रा.र.वि.म. (मर्या.) चा पावसाळी नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत राहणार

मुंबई — दि. ११ जून, २०२०.

मुंबई महानगर प्रदेशातील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारितील बांधकाम स्थितीतील पायाभूत सुविधा प्रकल्प, वापरात असणारे उड्डाणपूल व रस्त्यासंदर्भात पावसाळ्यादरम्यान तक्रारींचे निवारण करण्यासाठी म.रा.र.वि.म. मार्फत नियंत्रण कक्ष सुरु करण्यात आला आहे. सदर नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत राहणार असून महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी येथे कर्तव्य बजावणार आहेत.

मुंबई महानगर प्रदेशातील महामंडळाच्या अखत्यारितील विविध उड्डाणपूल, रस्त्यांची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी अभियांत्रिकी विभागाकडे आहे. तसेच महामंडळाचे प्रकल्प राबविण्यात येत असलेल्या परिसरात पावसाळ्यादरम्यान सर्वसामान्यांच्या तक्रारीचे निरसन करण्याकरिता हा नियंत्रण कक्ष सुरु करण्यात आला आहे. राज्य (मंत्रालय) व बृहन्मुंबई महानगरपालिका आपत्कालीन नियंत्रण कक्षाच्या बरोबर म.रा.र.वि.म. (मर्या.) च्या नियंत्रण कक्षाचा समन्वय राहील. सदर नियंत्रण कक्ष ३० सप्टेंबर, २०२० पर्यंत कार्यरत राहील.

नियंत्रण कक्षाचे दूरध्वनी क्रमांक : ०२२ — २६४२०९१४ / २६५१७९३५

मोबाईल क्रमांक : ८८२८४२०२६०

(तुषार अहिरे)
जनसंपर्क अधिकारी

नोंदणीकृत कार्यालय : [illegible], के.सी. मार्ग, वांद्रे (प.), मुंबई - ४०० ०५०.
दूरध्वनी : [illegible] फॅक्स : [illegible]
कॉर्पोरेट कार्यालय : नेपियन सी रोड, प्रियदर्शिनी पार्क शेजारी, मुंबई - ४०० ०३६.
दूरध्वनी : [illegible]
[illegible]